जा क्र.ई-१/प्रयंचा -पोउपनि बि.सं.(वाह.)/पदोन्नती/२०१७/ 4233
अपर पोलीस महासंचालक व संचालक,
पोलीस बिनतारी संदेश म.राज्य पुणे ८
यांचे कार्यालय.दिनांक : - १९/ ०८ / २०१७

संदर्भ :-शासन अधिसूचना,समान्यप्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/कार्या. १२,दि.२८/४/२०१५, अधिसूचना सुधारणा दि.१६/७/२०१५ आणि अधिसूचना (दुसरी सुधारणा) दि.१५/६/२०१७

**विषय :** -पोलीस बिनतारी संदेश विभागातील सहाय्यक पोलीस उप निरीक्षक ( प्रमुख यंत्रचालक ) यांना पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश ( वाह.) या पदावरील पदोन्नतीवर पदस्थापना देणे बाबत. (निवडसूची २०१६-२०१७)

*************

**आ दे श :-**

उपरोक्त संदर्भांमध्ये नमूद केलेल्या अधिसुचनांचे पालन करुन पोलीस बिनतारी संदेश विभागातील खालील नमूद केलेल्या सहाय्यक पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश ( प्रमुख यंत्रचालक ) यांना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र.४ मध्ये महसूली विभागाचे वाटप करण्यात आले असून रकाना क्र.५ मध्ये दर्शविलेल्या घटकात त्यांची पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश (वाहतूक) या पदावर तात्पुरत्या स्वरुपात कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून खालील अटींच्या अधिन राहुन पदोन्नतीवर पदस्थापना करण्यात येत आहे.

**सहा. पो.उपनि बि.सं.( प्रमुख यंत्रचालक) -वेतन बॅन्ड पीबी-१ रु.५२०० - २०२००+ ग्रेड पे २८००**
**पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश ( वा.)वेतन बॅन्ड पीबी-२ रु.९३००- ३४८०० + ग्रेड पे ४३००**

| अ. क्र. | सपोउनि.(प्र.यं.चा.) यांचे नांव व जातीचा प्रवर्ग | सध्याची नेमणूक व आस्थापना | संदर्भामधील तरतुदीनुसार वाटप करण्यात आलेला महसुली संवर्ग | पो.उप नि. बि.सं.(वाह) पदावर दिलेल्या पदोन्नतीवरील नेमणूक | पदोन्नती कोणत्या प्रवर्गातुन दिली व अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | माळी बाळासाहेब तुकाराम **(इमाव प्रवर्ग)** | **लोहमार्ग मिरज** पो.अधिक्षक, लोहमार्ग, पुणे | नागपुर-१ | **भंडारा** पोलीस अधीक्षक, भंडारा | खुल्या प्रवर्गातून रिक्त पदी |
| २ | गायकवाड सदानंद हरिशचंद्र **( इमाव प्रवर्ग )** | **बि.सं.पश्चिम विभाग पुणे** पो.अधीक्षक, बि.सं. पश्चिम विभाग पुणे. | कोकण-२ | **लोहमार्ग मुंबई** पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई | खुल्या प्रवर्गातून रिक्त पदी |
| ३ | मुळे उमाजी शेषराव **( खुला प्रवर्ग)** | **लातुर** पोलीस अधीक्षक लातुर | नागपूर-२ | **गोंदिया** पोलीस अधीक्षक, गोंदिया | खुल्या प्रवर्गातून रिक्त पदी |
| ४ | देसले पुंडलिक तातु **( खुला प्रवर्ग )** | **पिंपळगाव टॅप**, पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण | नाशिक-१ | **गट क्र.६ धुळे** समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र.६, धुळे | खुल्या प्रवर्गातून रिक्त पदी |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ५ | पाटील अजबसिंग जयसिंग **( खुला प्रवर्ग )** | **लोहमार्ग नंदुरबार** पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपुर | नाशिक-२ | **नंदुरबार** पोलीस अधीक्षक, नंदुरबार | खुल्या प्रवर्गातून रिक्त पदी |
| ६ | जाधव भानुदास कोंडिबा **(इमाव प्रवर्ग)** | **लातुर** पोलीस अधीक्षक लातुर | पुणे | **सांगली** पोलीस अधीक्षक, सांगली | खुल्या प्रवर्गातून रिक्त पदी |
| ७ | शिरले विनोद लक्ष्मण **(इमाव प्रवर्ग)** | **औरंगाबाद ग्रामीण** पोलीस अधीक्षक औरंगाबाद ग्रामीण | नागपूर-३ | **बि.सं.,पूर्व विभाग, नागपूर** पोलीस अधीक्षक, बि.सं.,पूर्व विभाग, नागपूर | खुल्या प्रवर्गातून रिक्त पदी |
| ८ | रामटेके विलास सिताराम **(अनु.जाती प्रवर्ग)** | **चंद्रपुर** पोलीस अधीक्षक चंद्रपुर | नागपूर-४ | **वर्धा** पोलीस अधीक्षक, वर्धा | अनु.जाती प्रवर्गातून रिक्त पदी |

२. उपरोक्त प्रमुख यंत्रचालक यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा दिनांक त्याच दिवशी हया कार्यालयास कळवावा. तसेच ते पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होताच, त्यांनी पोलीस उप निरीक्षक बि.सं.(वाह) पदाचा कार्यभार स्विकारल्याचा दिनांक सुध्दा संबंधीत घटक प्रमुखांनी विनाविलंब हया कार्यालयास कळवावा.

३ उपरोक्त नमुद केलेल्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या प्रमुख यंत्रचालक यांच्यापैकी एखाद्याविरुध्द आता गुन्हा दाखल झाला असेल / निलंबनाची कारवाई केली असले / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तर, संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांच्या विरुध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास फक्सद्वारे तात्काळ पाठवावी व पुढील आदेशांची वाट पहावी.

४. उपरोक्त आदेशांत नमूद केलेल्या ज्या प्रमुख यंत्रचालक यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रलंबित आहे. अथवा विभागीय चौकशीत निर्गमीत केलेल्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नाही. अशा प्रमुख यंत्रचालक यांचेकडून दिनांकित स्वाक्षरी केलेले लेखी हमीपत्र घेवून व त्यास अधिन राहुनच, त्यांना पदोन्नतीवर सोडण्यात यावे, तसेच संबंधीत प्रमुख यंत्रचालक यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त केलेल्या आदेशातही तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. सदर आदेशाची व त्यांच्या लेखी हमीपत्राची प्रत हया कार्यालयास सादर करण्यात यावी. तसेच त्याची प्रत संबंधीत प्रमुख यंत्रचालक ज्या घटकात आता पदोन्नतीवर हजर होणार आहेत, त्या घटकप्रमुखांना देखील न चुकता पाठवावी. तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

५. उपरोक्त आदेशांमधील प्रमुख यंत्रचालक जर मागास प्रवर्गातील असतील तर, त्यांच्या जात वैधता प्रमाणपत्रांची पडताळणी झालेली असल्याची खातरजमा करावी. उपरोक्त आदेशांतील ज्या मागासवर्गीय पोलीस कर्मचा-याकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल, त्यांच्याकडून ते प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही संबंधीत घटकप्रमुखांनी करावी. तो पर्यंत त्यास पदोन्नतीवर कार्यमुक्त करु नये.

६. येथुन पुढे प्रमुख यंत्रचालक ते पोलीस उप निरीक्षक बि.सं.(वाह) पदावर देण्यात येणा-या सर्व पदोन्नती मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपिठापुढील दाखल याचिका क्र.२७९७/२०१५ व याचिका क्र.४७०/२००५ मधील अंतिम निर्णयाच्या अधिनस्त राहुन देण्यात येत आहेत.

७. प्रमुख यंत्रचालक यांना पोलीस उप निरीक्षक बि.सं.(वाह) पदावर पदोन्नतीवरील पदस्थापना, शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र१५६/कार्या-१२, दिनांक २८/४/२०१५, अधिसूचना सुधारणा दि.१६/७/२०१५ व अधिसूचना (दुसरी सुधारणा) दिनांक १५/६/२०१७ मधील तरतुदीनुसार देण्यात आलेली आहे.

८. सदर पदोन्नती आदेशांमधील प्रमुख यंत्रचालक हे जर आदेशांमध्ये नमूद केलेल्या घटकांमध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते ज्या घटकात कार्यरत आहेत, त्या घटकप्रमुखांनी त्यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे, व तसे हया कार्यालयास न चुकता कळवावे.

९. सदरची नियुक्ती महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार करण्यात येत आहे.

१०. पदोन्नती नंतर कनिष्ठ पदातील वेतनवाढीनंतर वेतन निश्चितीकरिता द्यावयाच्या विकल्पासंबंधी शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमांक वेपूर १२९८/प्रक्र-१३/९८/सेवा -१० दि.१०/१२/९८ च्या आदेशाची माहिती पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश (वाहतूक) या पदावर पदोन्नती झालेल्या कर्मचा-यास द्यावी. असा विकल्प द्यावयाचा असेल तर त्यांनी पदोन्नती मिळाल्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत असा विकल्प द्यावा. मुदतीत विकल्प न आल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही व त्यांची वेतननिश्चिती म.ना.से.(वेतन)नियम -१९८१,नियम क्र.११(एक)(ए) प्रमाणे करण्यात येईल याची संबंधितांस समज द्यावी.

११. कालबध्द पदोन्नती घेतली असल्यास संबंधीत कर्मचा-यास पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती अनुज्ञेय असणार नाही. संबंधीत कर्मचारी पदोन्नती स्विकारण्यास तयार नसतील तर त्यांची कालबध्द पदोन्नती (वरिष्ठ वेतनश्रेणी) काढून घेण्यात यावी त्याप्रमाणे अहवाल सादर करण्याची तजवीज ठेवावी.

१२. पोलीस बिनतारी संदेश विभागातर्फे पदोन्नत अधिकारी यांचे अभिनंदन व त्यांना शुभेच्छा देणेत येत आहेत.

**( रितेश कुमार )**
**अपर पोलीस महासंचालक व संचालक,**
**पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य,पुणे.**

**प्रति,**

पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई
पोलीस अधीक्षक, लातुर / नाशिक ग्रामीण /औरंगाबाद ग्रामीण / चंद्रपुर / सांगली /भंडारा/ गोंदिया / वर्धा / नंदुरबार / लोहमार्ग पुणे / लोहमार्ग नागपूर / बि.सं. पश्चिम विभाग, पुणे / बि.सं.पूर्व विभाग, नागपूर.
समादेशक, रा रा पो बल गट क्र. ६ धुळे.
पोलीस उप आयुक्त, बिनतारी संदेश, मुंबई

__प्रत सादर -__ पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई ( लक्षवेध - कार्यासन क्र ५ अ )

प्रत :-

पोलीस उप अधीक्षक, बि.सं., कोल्हापूर परिक्षेत्र/ नाशिक परिक्षेत्र / औरंगाबाद परिक्षेत्र / अमरावती परिक्षेत्र/ नागपूर परिक्षेत्र

पोलीस निरिक्षक, बि स., लातुर / नाशिक ग्रामीण /औरंगाबाद ग्रामीण / चंद्रपुर / सांगली /भंडारा/ गोंदिया /वर्धा / नंदुरबार / लोहमार्ग पुणे / लोहमार्ग नागपूर / गट क्र.६ धुळे

पोलीस उप निरीक्षक, बि.सं. लोहमार्ग मुंबई.

**स्थानिक प्रती :-**

पोलीस अधिक्षक बिनतारी संदेश, मुख्यालय, पुणे.

पोलीस उप अधिक्षक बिनतारी संदेश, वाहतूक / सायफर/ पुणे .

गृह पोलीस निरीक्षक, संचालक कार्यालय, पुणे / प्रमुख लिपिक आस्थापना शाखा - १ /ई-५ लिपीक/ भरती कक्ष /क शाखा / फ शाखा/

आदेश -फाईल.